MHRG070003102026

<u>फौजदारी चौकशी अर्ज क्र.४५/२०२६ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश</u>

सदर अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम ५०३ अन्वये अर्जदार **इरफान सलीम अब्दुलगनी सय्यद** राहणार – रुम नं.२, रेतीबंदर रोड, कल्याण वेस्ट, चिराग हॉटेलच्या बाजूला, कल्याण, जि. ठाणे ४२१३०१ यांनी नेरळ पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्र.०४/२०२६ मधील ग्रे रंगाची मारूती सुझुकी कंपनीची कार नोंदणी क्र. MH02/BT-0730 चेसीस क्र.MA3EFJC1S00168252, इंजिन क्र. M16AN2028595 चा ताबा मिळणेसाठी केलेला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, सदर चारचाकी गाडी अर्जदार यांची असून नेरळ पोलीसांनी जप्त केलेली आहे. चारचाकी गाडी अर्जदार यांना घरगुती तसेच दैनंदिन कामासाठी नेहमी वापरावी लागते. सदरची चारचाकी गाडी गेल्या अनेक दिवसांपासून नेरळ पोलीस स्टेशनच्या आवारात पडून आहे. सदरची चारचाकी गाडी पोलीस स्टेशनला अजून काही दिवस ठेवल्यास त्या चारचाकी गाडीवर ऊन, वारा, प्रकाश यांचा परिणाम होऊन चारचाकी गाडीला गंज लागण्याची शक्यता आहे. तसेच चारचाकी गाडी नेरळ पोलीस स्टेशनला अजून काही दिवस उभी राहिल्यास बंद पडण्याची शक्यता आहे. सदर चारचाकी गाडीचे खूप मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. सदरची चारचाकी गाडी अर्जदार यांना मिळाली नाही तर अर्जदार यांचे फार मोठ्या प्रमाणात कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे.सबब, अर्जदार यांची विनंती की, वर वर्णन केलेली चारचाकी गाडी

अर्जदार यांचे ताब्यात देण्याचा हुकूम व्हावा. मा. न्यायालय सांगेल त्या अटी व शर्ती अर्जदार पाळण्यास तयार आहे. मा.न्यायालय सांगेल त्यावेळी सदरची चारचाकी गाडी मा. न्यायालयात दाखल करील. मा. न्यायालयाचे संमतीशिवाय सदरची चारचाकी गाडी कोणासही विकणार नाही. मा. न्यायालयाचे संमतीशिवाय सदरची चारचाकी गाडी कोणासही गहान, दान, विक्री इत्यादी करणार नाही. मा. न्यायालय सांगेल त्या रक्कमेचा बॉड देणेस अर्जदार तयार आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांचेकडून सदरची चारचाकी गाडी विक्री केली गेल्यास त्या चारचाकी गाडी किंमती इतकी रक्कम मा. न्यायालयात भरण्यास अर्जदार तयार आहे.

०३. सहा. सरकारी अभियोक्ता आणि तपासी अंमलदार यांचे म्हणणे मागविले. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे कथन केले आहे की, सदर प्रकरणातील जप्त करण्यात आलेले वाहन हे गुन्ह्यांचे तपासकामी महत्त्वाचा पुरावा आहे. सदरचे वाहन हे अर्जदार यांचे ताब्यातून जप्त आहे. सदर गुन्हयाचा तपास प्रलंबीत आहे. सदर वाहन अर्जदारास परत केल्यास त्याच्यामध्ये फेरबदल अथवा विक्री करु शकतो अथवा अश्याच प्रकारचे गुन्हे करणे कामी वापर करु शकतो. सबब, अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा ही विनंती. तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन सदर गुन्ह्यामध्ये वापरलेली ग्रे कलरची सुजूकी कंपनीची अॅक्सेस – ४ मॉडेलची कार ही अर्जदार यांच्या मालकीची असल्याचे निष्पन्न झाले आहे. जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांना परत दिल्यास ते पुन्हा अशा प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही. जप्त मुद्देमाल अर्जदारास परत दिल्यास त्यामध्ये छेडछाड करुन बदल करण्याची शक्यता नाकारता येत नाही. मा. न्यायालयाचा योग्य तो आदेश होणेस विनंती आहे.

०४. मी दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी त्यांच्या आधारकार्डची साक्षांकित प्रत, वर नमुद चारचाकी गाडीच्या आर.सी. बुकची झेरॉक्स प्रत, अर्जदाराच्या वाहन चालविण्याच्या परवान्याची साक्षांकित प्रत, दिनांक ०५/०१/२०२६ रोजी झालेला गाडी विक्रीचा करारनाम्याची साक्षांकित प्रत, रिमांड रिपोर्टची सर्टिफाइड प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदरची कागदपत्रे पडताळुन पाहिली असता सदरचे चारचाकी वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे स्पष्ट होते.

०५. संबंधित मुद्देमाल नेरळ पोलीस स्टेशन यांचे कार्यालयात ठेवुन दिल्यास कोणताही उद्देश साध्य होणार नाही. सबब, सदर जप्त मुद्देमाल अर्जदारास परत देणे मला उचित वाटते. करिता निम्नलिखित आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | नेरळ पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्र.०४/२०२६ मधील ग्रे रंगाची मारूती सुझुकी कंपनीची कार नोंदणी क्र. MH02/BT-0730 चेसीस क्र.MA3EFJC1S00168252, इंजिन क्र. M16AN2028595 ही अर्जदार **इरफान सलीम अब्दुलगनी सय्यद** यांना रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख) रुपयांच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अंतरिम स्वरुपात द्यावा. |
| ३. | जप्त चारचाकी वाहन हे अर्जदाराचे नसल्याचे निष्पन्न झाल्यास सदर वाहनाची किंमत अगर वाहन अर्जदार यांनी परत करावे. |
| ४. | अर्जदाराने चारचाकी वाहन हे निर्देशित तारखेस न्यायालयात हजर ठेवावे. तसेच सदर वाहन हे गहाण, दान, विक्री, त्याचे स्वरुपात कोणताही बदल न करणे, कोणासही हस्तांतरण न करणे व नष्ट न करणे. |

| | |
|---|---|
| ५. | तपासी अंमलदार यांनी अर्जदारास सदर चारचाकी वाहन देण्यापुर्वी त्याचे छायाचित्र अर्जदाराच्या खर्चाने काढुन त्याचा सविस्तर पंचनामा तयार करावा व गुन्हयाच्या दोषारोपत्रात त्याचा समावेश करावा. |
| ६. | अर्जदाराने सदर चारचाकी वाहनाचा वापर कोणत्याही अवैध कारणासाठी करु नये तसेच सदर वाहन हे अवैध कोणासही वापरण्यास देऊ नये. |
| ७. | सदर आदेशाची प्रत नेरळ पोलीस स्टेशन यांच्याकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी. |

Sd/-

कर्जत
दिनांक : ११/०५/२०२६

(ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.
जि. रायगड